// सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर
दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३
E-mail:ronagpur.dte@gmail.com
Website:www.rdtenagpur.org.in

अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित

क्र.तंशिसं/विकाना/शैवि/ Poly meritlist /२०१६ /2910

दिनांक: 15 OCT 2016

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व तंत्रनिकेतन संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

**विषयः- प्रवेश नियामक प्राधिकरण व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील तंत्रनिकेतन अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करण्याबाबत.**

**संदर्भः- मा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्रं.१०/एनजीपी/मेरीट लीस्ट/२०१६-१७/१३५५,दि.३०/०९/२०१६**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या प्रथम वर्ष तसेच थेट व्दितीय पदवीका अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यांत येणार आहेत. पडताळणी करतांना सर्वसाधारणपणे खालील कार्यपध्दती अवलंबविण्यांत यावी.

१. प्रवेश नियामक प्राधिकरण व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणा-या अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करतांना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची आपले संस्थेतील प्राचार्यानी/ संस्था प्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी करणे आवश्यक आहे. अशा सुचना संचालनालयाने आपणांस दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने आपले संस्थेत सर्व प्रकारच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे पडताळणी केलेली असल्याचे संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणीचे वेळी सोबत आणावे.

२. गुणवत्ता यादी पडताळणीसाठी संचालनालयाचा संकेतांक व पासवर्डव्दारे ऑनलाईन पध्दतीने लॉगईन करुन आपले संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीची प्रिंटआऊट घेऊन ती पडताळणीसाठी उपयोगात आणावी. कोणत्याही परिस्थितीत संचालनालयाच्या संकेतस्थळाव्यतीरीक्त अन्य यादी (उदा. **Word File etc.**) पडताळणीकरीता वापरली जाणार नाही.

३. प्रवेश नियमांचे उल्लंघन करुन अथवा करुन अथवा मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे किंवा कट ऑफ डेट नंतर प्रवेश करणा-या / अपलोड करणा-या संस्थांनी अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश तात्काळ रद्द करण्यांचे आदेश संचालनालयांचे पत्र क्रं.२अ/एडीएम/२०१६/१२५७,दि.२०सप्टेंबर२०१६ नुसार देण्यात आलेले आहे.

४. गुणवत्ता यादीत काही अनियमितता आढळून आल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील तदअनुषगांने गंभीर कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

५. गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर आढळून आलेल्या सर्व त्रुटीची पुर्तता करण्याबाबत आपले संस्थेला कळविण्यांत येईल. तसेच पडताळणी करतांना उमेदवारांचे प्रवेश रद्द केले/झाले तर संचालनालयाच्या संकेतस्थळावर संस्थेच्या आयडीने लॉगईन करुन ऑनलाईन पध्दतीने अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करण्यांत येईल. त्यानंतर गुणवत्ता यादीची नव्याने प्रिंटआऊट काढून त्यानुसार पडताळणी करण्यांत येईल.

६. गुणवत्ता यादी पडताळणी करतेवेळी शुल्क परताव्याबाबत आपले संस्थेबद्दल काही तक्रारी आहे किंवा कसे याची शाहानिशा करुन व तक्रार असल्यास ती नियमानुसार निवारण करण्यांत आली किंवा कसे याची पडताळणी केल्यानंतरच गुणवत्ता यादी पडताळणीची कार्यवाही करण्यांत येईल. शुल्क परतावा किंवा कागदपत्रे परत न देणे अशा प्रकारच्या तक्रारीचे निवारण झालेले नसल्यास प्रवेश नियमावलीतील नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी व यापुढे अशाप्रकारचे नियमबाहय कृत्य होणार नाही असे प्राचार्यांकडून लेखी हमीपत्र सादर केल्यानंतरच गुणवत्ता यादी पडताळणी

करण्यांत येईल याची नोंद घ्यावी. तसेच शुल्क परताव्याबाबत संस्थेकडे कोणत्याही प्रकारची तक्रार नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र आपले संस्थेतील प्राचार्याकडून सादर करावे. त्याचप्रमाणे नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव **(FD)** भरणा केली आहे किंवा नाही याची सुध्दा पडताळणी करण्यांत यावी . ठेव भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर गुणवत्ता यादी पडताळणी करण्यांत येईल. तसेच शै. वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यांत आलेली आहे. अशा संस्थाकडून शासनास भरणा करावयाचे नोंदणी शुल्काची आकारणी करण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार अशा संस्थांनी नोंदणी शुल्क भरण्यात यावे याची नोंद घ्यावी. संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या प्रवेश प्रक्रियांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत त्वरीत पडताळणी करुन घ्यावी.

गुणवत्ता यादी मंजुर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा कोणत्याही प्रकारची अनियमितता असल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वसी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहील.

**गुणवत्ता यादी पडताळणीकरीता येताना सोबत तपासणीकरीता लागणारे साहित्य (जसे – पेपर रिम, पंचिंग मशिन, कॅलक्युलेटर, स्टॅपलर, फ्लॅग, इ.) सोबत आणावे.**

सहपत्रे : १. वेळापत्रकाची प्रत.
२. संदर्भांकित पत्राची प्रत

( गुलाबराव ठाकरे )
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर**

प्रत : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (का.क्र. १०) यांना माहितीकरीता मानार्थ सादर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.
E-Mail:diplomadesk10dte@gmail.com Web site: http://www.dtemaharashtra.gov.in


जा. क्र. १०/एनजीपी/मेरीट लिस्ट/२०१६-१७/ ९३५५
दिनांक : 30 SEP 2016

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादी पडताळणी करणेबाबत..
संदर्भ : दिनांक १९ सप्टेंबर,२०१६ रोजी झालेली बैठक

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५,दिनांक १७.८.२०१५ लागू केला. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या अनुषंगाने दिनांक ११.३.२०१६ रोजी शासनाने राजपत्राद्वारे प्रवेश पात्रता व प्रवेश नियम प्रसिध्द केले आहेत.

प्रवेश नियमातील मुद्दा क्रमांक १४ मध्ये महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५,दिनांक १७.८.२०१५ मधील मुद्दा क्रमांक ९(५) मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक विनाअनुदानीत संस्था प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत प्रवेश मंजूरीचे प्रस्ताव सादर करील, प्रत्येक संस्था संबंधित संचालनालयाने प्रमाणित केलेले असे प्रस्ताव अशा प्रमाणितच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालमर्यादेच्या आत प्रवेश नियामक प्राधिकरणाला सादर करील असे स्पष्ट केले आहे. त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक पोस्ट एस. एस.सी. व पोस्ट एच. एस. सी. व थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी शासनाने प्रसिध्द केलेल्या प्रवेश नियम व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने प्रसिध्द केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पडताळणी करून ती वर नमूद मुदतीच्या आत मा.आयुक्त,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

गुणवत्ता यादी पडताळणी करताना खालील बाबींची पडताळणी करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

१. अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याचा वैध कालावधीची पडताळणी करण्यात यावी.
२. अल्पसंख्यांक कोटयात रजिस्ट्रेशन करताना उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासधारक असणे आवश्यक होते. यासंदर्भाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने दिनांक १७.६.२०१६ रोजी सूचना निर्गमित केलेल्या होत्या. अल्पसंख्यांक कोटयात प्रवेशित उमेदवारांची पडताळणी करताना त्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
३. न्यायालयीन प्रकरणी ४२४४/२०१६, ८७४९/२०१६ या रिट याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या निर्देशानुसार इयत्ता बारावी विज्ञान शाखे व्यतिरिक्त इतर शाखेतून बारावी पास झालेले व नंतर फिजीक्स, केमेस्ट्री, मॅथेमॅटीक्स व बायोलॉजी हे विषय घेऊन ( isolated ) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पोस्ट एच. एस. सी. औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रक्रीयेमध्ये सामावुन घेण्याच्या सुचना या संचालनालयाचे दि. No/ADM/CC/Diploma/Post HSC/२०१६-१७/८९१, दि. २८.७.२०१६ च्या महत्वाचे परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. गुणवत्ता यादी पदताळणी करताना त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.
४. महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था ( प्रवेश व शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम, २०१५ , दिनांक १७.८.२०१५ अस्तित्वात आला असून त्यामध्ये उशिरा प्रवेश /प्रवेशित उमेदवारांची माहिती उशिरा अपलोड करणे,मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही. ही बाब विचारात घेता विहीत मुदतीनंतर

केलेले किंवा संकेत स्थळावर उशिरा अपलोड केलेले प्रवेश आणि मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केलेले प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येऊ नयेत. असे प्रवेश रद्दबातल ठरविण्यात यावेत व तसे प्रवेश नियामक प्राधिकरणासही कळविण्यात यावे., तरी सदर बाबही गुणवत्ता यादी पडताळणी करताना विचारात घेण्यात यावी.

५. सर्व अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादया पडताळणी करताना प्रवेशित उमेदवारांची संबंधित अभ्यासक्रम निहाय शैक्षणिक अर्हतेची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे ही बाब पडताळणी पथकास सूचित करावी.

६. प्रवेश नियामक प्राधिकरण तसेच या संचालनालयाने वेळोवेळी निर्गमित सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

७. प्रवेश नियामक प्राधिकरणाने गुणवत्ता यादी सादर करण्यासाठी निश्चित केलेल्या शुल्कासह संस्थेने विहीत दिनांकापर्यंत गुणवत्ता यादी सादर करणे आवश्यक असल्याचे आपल्या विभागातील सर्व संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावे.

८. मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत विद्यार्थ्याचे जात प्रमाणपत्र व आवश्यक ते नुसार संबधित विद्यार्थ्यांचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची बाब विचारात घेऊन त्यानुसार पडताळणी करावी.

९. दिनांक १९/०९/२०१६ रोजी संचालनालयात आयोजित बैठकीत दिलेल्या अनुषंगिक सूचना विचारात घेऊन याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

( डॉ.सुभाष महाजन )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

## गुणवत्ता यादी तपासणी वेळापत्रक वर्ष २०१६-१७

### अभ्यासक्रमाचे नांव – प्रथम व थेट व्दितीय वर्ष तंत्रनिकेतन

| अ. क्र. | संस्था क्रमांक | संस्थेच नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | २०१६-१७ प्रवेशित संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | 4135 | Amar Seva Mandal's Shree Govindrao Vanjari College of Engineering & Technology, Nagpur | 1st year Poly | 180 | 76 | १९-१०-२०१६ ते २० -१०-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 180 | 112 | |
| 2 | 4145 | Wainganga College of Engineering and Management, Dongargaon, Nagpur | 1st year Poly | 240 | 88 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 89 | |
| 3 | 4151 | Vidarbha Bahu-Uddeshiya Shikshan Sanstha's Tulshiramji Gaikwad Patil College of Engineering & Technology, Nagpur | 1st year Poly | 240 | 215 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 228 | |
| 4 | 4181 | Sarvasiddhanta Education Soc's Nuva College of Engineering and Technology, Nagpur | 1st year Poly | 180 | 110 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 180 | 40 | |
| 5 | 4185 | Shree Bapuraoji Deshmukh Foundation, Suresh Deshmukh College of Engineering, Selukate, Wardha | 1st year Poly | 120 | 50 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 120 | 48 | |
| 6 | 4186 | Datta Meghe Institute of Medical Science's Datta Meghe Institute of Engineering & Technology & Research, Savangi (Meghe) | 1st year Poly | 240 | 38 | २१ -१०-२०१६ ते २३-१०-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 64 | |
| 7 | 4188 | Krushi Jivan Vikas Pratishthan, Ballarpur Institute of Technology, Mouza Bamni | 1st year Poly | 504 | 267 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 480 | 320 | |
| 8 | 4190 | M.D. Yergude Memorial Shikshan Prasarak Mandal's Shri Sai College of Engineering & Technology, Badravati | 1st year Poly | 120 | 22 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 120 | 50 | |
| 9 | 4193 | K.D.M. Education Society, Vidharbha Institute of Technology,Umred Road ,Nagpur | 1st year Poly | 180 | 43 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 180 | 72 | |
| 10 | 4195 | Vidharbha Bahu uddeshiya Shikshan Sanstha's Abha Gaikwad – Patil College of Engineering, Nagpur | 1st year Poly | 240 | 42 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 95 | |

अभ्यासक्रमाचे नांव – **प्रथम व थेट व्दितीय वर्ष तंत्रनिकेतन**

| अ. क्र. | संस्था क्रमांक | संस्थेच नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | २०१६-१७ प्रवेशित संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 11 | 4235 | Jai Mahakali Shikshan Sanstha's Agnihotri School of Technology, Ramnagar, Wardha | 1st year Poly | 561 | 163 | २४-१०-२०१६ ते २५-१०-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 540 | 149 | |
| 12 | 4236 | Om Arunodaya Bahuuddeshiya Khadi Gramodyog Vikas Sanstha's Om Polytechnic, Sawangi (Meghe), Wardha | 1st year Poly | 315 | 49 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 28 | |
| 13 | 4237 | Umrer Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 252 | 48 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 270 | 79 | |
| 14 | 4238 | Sanmarg Shikshan Sanstha, Shri Krushnarao Pandav Polytechnic, Bahadura, Nagpur | 1st year Poly | 315 | 31 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 100 | |
| 15 | 4239 | The Shriram Gramvikas Shikshan Sanstha, Baburaoji Tidake Polytechnic, Mouda, Nagpur | 1st year Poly | 371 | 157 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 360 | 114 | |
| 16 | 4227 | Vivekanand Polytechnic,SitaSaongi,Tal-Tumsar,Dist-Bhandara | 1st year Poly | 253 | 88 | २६-१०-२०१६ते २७-१०-२०१६ सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 87 | |
| 17 | 4229 | Bajaj Chandrapur Polytechnic, Chandrapur | 1st year Poly | 389 | 175 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 430 | 152 | |
| 18 | 4230 | Shri Sadashivrao Patil Shikshan Sanstha's Kamptee Polytechnic, Kamptee | 1st year Poly | 379 | 89 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 360 | 98 | |
| 19 | 4231 | Sanmarg Shikshan Sanstha's Late Vasantdada Polytechnic, Nagpur. | 1st year Poly | 441 | 131 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 420 | 130 | |
| 20 | 4232 | Navodaya Shikshan Sanstha's Shankarrao Dhawad Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 222 | 60 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 270 | 43 | |

## अभ्यासक्रमाचे नांव – प्रथम व थेट व्दितीय वर्ष तंत्रनिकेतन

| अ. क्र. | संस्था क्रमांक | संस्थेच नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | २०१६-१७ प्रवेशित संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 21 | 4233 | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha's Priyadarshini Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 504 | 75 | २८-१०-२०१६ते २९-१०-२०१६ सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 600 | 143 | |
| 22 | 4234 | Late M.D. Yergude Memorial Shikshan Prasarak Mandal's Shri Sai Polytechnic, Chandrapur | 1st year Poly | 597 | 231 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 580 | 288 | |
| 23 | 4597 | Jai Mahakali Shikshan Sanstha, Pulgaon Polytechnic,Pulgaon, Tah-Deoli,Wardha | 1st year Poly | 252 | 45 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 83 | |
| 24 | 4598 | Maharashtra Shikshan Prasarak Mandals,Sommaya Diploma In Engineering, Wadgaon Dist Chandrapur | 1st year Poly | 504 | 369 | ०२-११-२०१६ते ०३-११-२०१६ सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 480 | 286 | |
| 25 | 4252 | Late Madhukarrao Deshmukh Education Soceity's Avdhoot Diploma College Of Engineering, Mouza, Bhojapur | 1st year Poly | 252 | 50 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 63 | |
| 26 | 4253 | Late Shri Laxmaji Motghare Critable Trust's Dr. Arun Motghare Polytechnic, Kosara-Konda, Bhandara | 1st year Poly | 252 | 115 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 31 | |
| 27 | 4254 | Krushna Sahayogi Tantra Shikshan Sanstha, Chatrapati Shivaji Institute Of Technology, Deori, Gondia | 1st year Poly | 189 | 70 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 180 | 73 | |
| 28 | 4255 | Jai Mahakali Shikshan Sanstha's Agnihotri Polytechnic, Sindhi (Meghe), Wardha | 1st year Poly | 252 | 117 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 56 | |
| 29 | 4256 | Shri Sachhidananda Shikshan Sanstha's Bhauraoji Taywade Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 315 | 0 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 0 | |
| 30 | 4258 | Dharampeth Education Soceity's Dharampeth Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 315 | 79 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 65 | |

## अभ्यासक्रमाचे नांव – प्रथम व थेट व्दितीय वर्ष तंत्रनिकेतन

| अ. क्र. | संस्था क्रमांक | संस्थेच नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | २०१६-१७ प्रवेशित संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 31 | 4599 | Jai Mahakali Shikshan Sanstha,Shri Babulalji Agnihotri School of Technology, Sindi (Meghe), Wardha | 1st year Poly | 63 | 0 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 60 | 0 | |
| 32 | 4601 | Guruvandan Mahila Kalyankari Bahuuddeshiya Mandal's Guru Sai Polytechnic College, Mauza Datala, Chandrapur | 1st year Poly | 441 | 150 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 420 | 149 | |
| 33 | 4602 | Shri Gurudeo Educational Memorial & Cultural Society, Om Polytechnic College, Mauza Parsodi, Tal-Umrer,Nagpur | 1st year Poly | 315 | 72 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 69 | |
| 34 | 4603 | Young Engineer's Education Society, Maharashtra Institute of Polytecnic, Betala, Bramhapuri,Chandrapur | 1st year Poly | 441 | 57 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 420 | 173 | |
| 35 | 4604 | Gramin Vikas Multipurpose Education Society,Prabhat Diploma College of Engineering, Mouza Rui, Ta-Bramhapuri, Chandrapur | 1st year Poly | 252 | 168 | ०४-११-२०१६ते ०५-११-२०१६ सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 126 | |
| 36 | 4605 | Vidyasagar Education Society, Gurukul Polytechnic, Nagra, Gondia | 1st year Poly | 315 | 91 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 74 | |
| 37 | 4608 | Shri Lalbahaddur Shastri Shikshan Prasarak Mandal, VJ Polytechnic, Mouza Khamona, Tah- Rajura, Chandrapur | 1st year Poly | 252 | 44 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 91 | |
| 38 | 4609 | Shri Vyankatesh Shikshan Sanstha's,Shri Vyankatesh Polytechnic, Yelakeli, Ta-Seloo,Wardha | 1st year Poly | 252 | 46 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 52 | |
| 39 | 4610 | Ballarpur Seva Samiti, Jainuddin Zaweri Polytechnic, Dewai Govindpur, Tukum, Chandrapur | 1st year Poly | 252 | 26 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 59 | |
| 40 | 4611 | Laxmi Shikshan Sanstha & Krida Mandal,Samrat Sewakbhau Waghaye Patil Polytechnic College,At Gadegaon, Lakhani, Dist Bhandara | 1st year Poly | 189 | 16 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 180 | 3 | |
| 41 | 4612 | Navneet Bahuuddeshya Sanstha, Kinkar Institute Of Technology,Seloo,Dist.Wardha | 1st year Poly | 315 | 147 | ०७-११-२०१६ते ०८-११-२०१६ सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 94 | |
| 42 | 4613 | | Direct 2nd Year Poly | 120 | 106 | |

अभ्यासक्रमाचे नांव – **प्रथम व थेट व्दितीय वर्ष तंत्रनिकेतन**

| अ. क्र. | संस्था क्रमांक | संस्थेच नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | २०१६-१७ प्रवेशित संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 43 | 4639 | Renaissance Polytechnic,Chandrapur | 1st year Poly | 315 | 113 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 137 | |
| 44 | 4642 | Wainganga Polytechnic, Sakoli | 1st year Poly | 315 | 66 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 120 | 63 | |
| 45 | 4240 | M.S. & M.G.V.B.S., Central India Institute Of Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 504 | 211 | ०९-११-२०१६ ते ११ -११-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 480 | 254 | |
| 46 | 4241 | Sanmarg Shikshan Sanstha, Shri Sharadchandra Pawar Polytechnic, Bhilewada | 1st year Poly | 378 | 84 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 360 | 207 | |
| 47 | 4242 | Mata Mahakali Bahuuddeshiya Shikshan Prasarak Mandal's Mata Mahakali Polytechnic College, Warora | 1st year Poly | 315 | 193 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 145 | |
| 48 | 4243 | Sanmarg Shikshan Sanstha'sm Smt. Radhikatai Pandav Polytechnic, Besa, Nagpur | 1st year Poly | 441 | 26 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 420 | 80 | |
| 49 | 4246 | Jaideo Education Society, J.D. Polytechnic, Khandala, Nagpur | 1st year Poly | 441 | 146 | १५-११-२०१६ ते १७-११-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 420 | 210 | |
| 50 | 4247 | Laxmanrao Mankar College Of Polytechnic, Amgaon, Gondia | 1st year Poly | 252 | 83 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 240 | 100 | |
| 51 | 4248 | Shri Sai Shikshan Sanstha's Nit Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 561 | 390 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 540 | 308 | |
| 52 | 4245 | Gopal Education Soceity's Shri Mukundrao Pannase Polytechnic, Mauza Mondha | 1st year Poly | 189 | 96 | १८-११-२०१६ ते १९-११-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 180 | 15 | |
| 53 | 4249 | Shri Nirmaladevi Education Soceity's Sonatai Pandav Polytehnic, Paradsinga | 1st year Poly | 378 | 19 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 360 | 66 | |
| 54 | 4250 | Maratha Shikshan Sanstha's P.R.Patil Instittute Of Polytechnic, Talegaon, Asthi, Wardha | 1st year Poly | 309 | 60 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 360 | 71 | |

अभ्यासक्रमाचे नांव – **प्रथम व थेट व्दितीय वर्ष तंत्रनिकेतन**

| अ. क्र. | संस्था क्रमांक | संस्थेच नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | २०१६-१७ प्रवेशित संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 55 | 4251 | Sant Tukdoji Maharaj Shikshan Sanstha's Shri Sai Taj Polytechnic, Drugdhamna, Nagpur | 1st year Poly | 441 | 51 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 420 | 72 | |
| 56 | 4222 | Nagpur Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 687 | 206 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 810 | 298 | |
| 57 | 4223 | Anjuman Hami-E-Islam's Anjuman Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 504 | 323 | २१-११-२०१६ ते २२-११-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 480 | 210 | |
| 58 | 4224 | Shri Datta Meghe Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 945 | 351 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 900 | 258 | |
| 59 | 4226 | Ankush Shikshan Sanstha's G.H. Raisoni Polytechnic, Nagpur | 1st year Poly | 753 | 297 | २३-११-२०१६ ते २५-११-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 720 | 304 | |
| 60 | 4015 | Acharya Shrimannarayan Polytechnic, Pimpri-Wardha | 1st year Poly | 315 | 172 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 360 | 65 | |
| 61 | 4023 | Adv.V.R.Manohar Institute of Diploma in Medical Lab.Technology ,Nagpur. | 1st year Poly | 63 | 61 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 60 | 37 | |
| 62 | 4228 | Ingole Shikshan Sanstha's Ingole Institute of Printing Technology,Nagpur. | 1st year Poly | 32 | 0 | |
| | | | Direct 2nd Year Poly | | | |
| 63 | 4244 | Backward class comitee's Smt.Rajshree Mulak Polytechnic for Women,Nagpur | 1st year Poly | 378 | 0 | |
| | | | Direct 2nd Year Poly | | | |
| 64 | 4600 | Shankarrao Chavan Polytechnic,Butibori,Tah-Hingana,Nagpur | 1st year Poly | 315 | 0 | |
| | | | Direct 2nd Year Poly | | | |

अभ्यासक्रमाचे नांव – **प्रथम व थेट व्दितीय वर्ष तंत्रनिकेतन**

| अ. क्र. | संस्था क्रमांक | संस्थेच नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | २०१६-१७ प्रवेशित संख्या | तपासणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 65 | 4008 | Government Polytechnic,Sakoli | 1st year Poly | 315 | 183 | २८-११-२०१६ ते २९-११-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 109 | |
| 66 | 4009 | Government Polytechnic,Bramhapuri | 1st year Poly | 558 | 234 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 540 | 116 | |
| 67 | 4010 | Government Polytechnic,Gadchiroli | 1st year Poly | 315 | 80 | ३०-११-२०१६ ते ०१-१२-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 300 | 114 | |
| 68 | 4011 | Government Polytechnic,Gondia | 1st year Poly | 378 | 287 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 360 | 118 | |
| 69 | 4013 | Government Polytechnic,Arvi | 1st year Poly | 357 | 261 | |
| | | | Direct 2nd Year Poly | 340 | 90 | |
| 70 | 4012 | Government Polytechnic,Sadar,Nagpur | 1st year Poly | 875 | 803 | ०२-१२-२०१६ ते ०३-१२-२०१६ (सकाळी १०.३० वा. हजर राहणे ) |
| | | | Direct 2nd Year Poly | 830 | 159 | |

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर